परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.२०२५६२१३४६
Website : www.unipune.ac.in.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

*(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)*

**Savitribai Phule Pune University**

*(Formerly University of Pune)*

**Board of Examinations & Evaluation**
**Ganeshkhind, Pune - 411007**
**Phone : 2025621398**
**E-mail :** bee@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/छा.व ता./८६२ दिनांक : १० जून, २०२५

**अत्यंत तातडीचे व कालबध्द**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा आणि दादरा–नगर हवेली)

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील उन्हाळी २०२५ सत्र परीक्षांचे अंतर्गत व सत्रांत गुण भरण्याकरिता अंतिम मुदतवाढ ...

संदर्भ :
१. परीक्षा/छा.व.ता./५९६, दिनांक ०८ एप्रिल, २०२५
२. परीक्षा/छा.व.ता./६४६, दिनांक १६ एप्रिल, २०२५
३. परीक्षा/छा.व.ता./६९२, दिनांक २५ एप्रिल, २०२५
४. परीक्षा/छा.व.ता./६९५, दिनांक २६ एप्रिल, २०२५
५. परीक्षा/छा.व.ता./७३०, दिनांक १२ मे, २०२५

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मधील उन्हाळी २०२५ सत्र परीक्षा सुरू झालेल्या आहेत. त्यानुसार BBA 2024 Credit Pattern, BBA (Computer Application) 2024 Credit Pattern, BBA (Inernational Business) 2024 Credit Pattern, BCA (Commerce) 2024 Credit Pattern & BCA (Science) 2024 Credit Pattern, अभ्यासक्रमांचे अंतर्गत गुण भरण्याकरिता ऑनलाईन लिंक सुरू करण्यात आलेली होती. सदर अभ्यासक्रमांच्या लिंकची मुदत दिनांक १० जून, २०२५ रोजी संपुष्टात आलेली आहे. याबाबत काही महाविद्यालयांनी अंतर्गत गुण भरण्याकरिता मुदत वाढीबाबत विनंती केलेली आहे. सदर बाब विचारात घेता उपरोक्त अभ्यासक्रमांचे **महाविद्यालय स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या प्रथम वर्षाकरिताचे अंतर्गत व सत्रांत परीक्षेचे गुण भरण्याकरिता दोन्ही ऑनलाईन लिंक एकत्रित दिनांक ११ जून, २०२५ ते दिनांक २३ जून, २०२५ या कालावधीकरिता** सुरू करण्यात येत आहे. सदर कालावधीत संबंधित अंतर्गत व सत्रांत गुण भरण्याची कार्यवाही करावी.

परीक्षांचे निकाल हे विहित मुदतीत जाहीर करण्याच्या अनुषंगाने यानंतर कोणत्याही परिस्थितीत अंतर्गत व सत्रांत गुण भरण्याकरिता मुदतवाढ मिळणार नाही, याची नोंद घ्यावी. परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर अंतर्गत गुणांबाबत प्राप्त होणारी सर्व प्रकरणे ही प्रमाद समितीसमोर सादर करण्यात येतील.

हे पत्रक सर्वच संबधित घटकांच्या निदर्शनास तात्काळ आणावे.

कळावे,

आपला,

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Mgnt-D:\AR & DR Letter\DR and AR File.docx